सेंट्रल हिंन्दू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे,

# भोसला मिलिटरी कॉलेज,

रामभूमी, नासिक—४२२००५

दिनांक १६/०८/२०२५

राजश्री शाहु महाराज शिष्यवृत्ती योजना

(Girls Freeship-UG and PG)

मुलींसाठी मोफत शिक्षण कायदा २०२४

तसेच

खुल्या प्रवर्गातील मुले व आर्थिक दृष्टया दुर्बल घटक

शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये प्रवेशित सर्व खुल्या प्रवर्गातील विदयार्थीनींना मोफत शिक्षण कायदा २०२४ च्या लाभासाठी महाडीबीटी संकेत स्थळावर राजश्री शाहु महाराज फॉर्म भरणे बंधनकारक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये प्रवेशित सर्व खुल्या प्रवर्गातील विदयार्थी व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकामधील महाडीबीटी संकेत स्थळावर राजश्री शाहु महाराज फॉर्म भरणे बंधनकारक आहे.

वरील दोन्ही योजनेचा लाभ घेण्यासाठी विदयार्थ्यांनी महाडीबीटी संकेत स्थळावर फॉर्म भरणे आवश्यक आहे सदर फॉर्म न भरल्यास आपणास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

- शैक्षणिक वर्ष **2025-26** मध्ये विदयार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने अर्ज खालील दिलेल्या संकेतस्थळावर भरणे बंधनकारक आहे.
- विदयार्थ्यांनी **https://mahadbt.maharashtra.gov.in** या वेबसाईटवरुन अर्ज भरावेत.
- **विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिपसाठी आधारकार्ड नंबर, मोबाईल नंबर व स्टेट बँक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक NPCI लिंक केलेले बंधनकारक आहे.**
- सदर आधारकार्ड नंबरशी लिंक असलेले मोबाईल नंबर व स्टेट बँक ऑफ इंडियाचे किंवा इंडीया पोस्ट बँक खाते कुठल्याही प्रकारे बंद होणार नाही किंवा बदलणार नाही तसे झाल्यास विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिप मिळणार नाही यांची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- सदर स्कॉलरशिप व फ्रिशिप फॉर्म करिता विदयार्थ्यांचा स्वतःचा मोबाईल नंबर आधार नंबर, स्टेट बँक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक, ई-मेल आय डी आवश्यक आहे. पालकांचे मोबाईल नंबर, स्टेट बँक ऑफ इंडियाचे खाते क्रमांक किंवा सायबर कॅफेचे मोबाईल नंबर किंवा ई-मेल आय डी देवू नये.
- ऑनलाइन फॉर्म भरताना खालील **सर्व मुळ कागदपत्रे (Original Document)** स्कॅन व्दारे वेगवेगळी पी डी एफ करून 250 के बी च्या आत साईज असलेली पीडीएफ ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावी.
- ऑनलाइन फॉर्म भरताना विदयार्थ्यांचा कलर फोटो (Original Document) स्कॅन व्दारे जेपीजी करून 250 के बी च्या आत साईज असलेली जेपीजी पध्दतीने अपलोड करावी.

➢ महाविदयालयात अर्ज जमा करतेवेळी सोबत मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी (Verification)सादर करावी. मुळ कागदपत्रे महाविदयालयात जमा होणार नाही.

➢ **विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना अचुक माहिती भरावी तसेच कागदपत्रे अपलोड करताना सोबत दिलेल्या सुचने प्रमाणे फक्त मुळ कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी.**

➢ विदयार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरताना चुका झाल्यास त्यास सर्वस्वी विदयार्थी जबाबदार राहील व सदर विदयार्थ्यांस स्कॉलरशिप व फ्रिशिप मिळणार नाही याची विदयार्थ्यांनी नोंद घ्यावी.

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतेवेळी मुळ कागदपत्रे अपलोड करणे बंधनकारक आहे झेरॉक्स प्रत अपलोड केल्यास शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही याची विदयार्थ्यानी नोंद घ्यावी.**

**ऑनलाईन पध्दतीने मुळ कागदपत्रे अपलोड Original Document करावी. भरलेला अर्ज महविदयालयात जमा करताना Xreox copy खालील क्रमानुसार कागदपत्रे जोडून दयावीत.**

1. स्कॉलरशिप व फ्रिशिपच्या अर्जाची प्रत
2. महाविदयालयातून प्राप्त केलेली प्रवेश पावतीची प्रत .(2025-26)
3. विदयार्थ्यांचे आधार कार्ड
4. दहावी, बारावी मुळ गुणपत्रक
5. शैक्षणिक वर्ष 2024-25 चे गुणपत्रक वर्षाचे मुळ गुणपत्रक (वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थ्यांचे मुळ गुणपत्रक उपलब्ध नसल्यास मुख्य यांची स्वाक्षरी व शिक्का घेवून गुणपत्रक अपलोड करावे)
6. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी दाखला (Age & Domicile Certificate) -तहसिलदाराचा किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेले.
7. विदयार्थ्यांच्या बँक पासबुक STATE BANK OF INDIA / POST BANK प्रत एम आय सी आर कोड व आय एफ एस कोड सहीत. विदयार्थ्यांच्या आधारकार्ड नंबरशी लिंक (NPCI-National Payments Corporation of India) असलेले
8. शाळा सोडल्याच्या दाखल्याची मुळ प्रत
9. रेशनकार्डाची प्रत
10. 31 मार्च 2026 पर्यंत वैध असलेले तहसिलदार किंवा सेतु कार्यालयाने निर्गमित केलेला वडीलांचा दाखला.( आर्थिक वर्ष -2024-25)
11. (फॉर्म नंबर 16 चालणार नाही ) वडील मृत असल्यास वडीलांचा मृत्युचा दाखला व आई/पालक यांचा उत्पन्नाचा दाखला.( आर्थिक वर्ष -2024-25)
12. वडील वेगळे रहात असल्यास आई/वडीलांचे घटस्पोटाचे कागदपत्रे व आई/पालक यांचा उत्पन्नाचा दाखला. .( आर्थिक वर्ष -2024-25)
13. वडील वेगळे रहात असल्यास आई /वडील यांचे 100 रुपयांच्या बॉन्डपेपरवर दाखला व आई/पालक यांचा उत्पन्नाचा दाखला.
14. विदयार्थी ऑनलाईन/ ऑफलाईन वर्गास 75 टक्के उपस्थितीबाबतचे स्वयं घोषणा पत्र
15. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्र
16. बीबीए, बीएस्सी संगणकशास्त्र, एमएस्सी संगणकशास्त्र व एम सी जे वर्गासाठी जातपडताळणी प्रमाणपत्राची प्रत
17. शैक्षणिक खंड असल्याचे खंड पत्र (Gap Certificate)

- शिष्यवृत्ती व फ्रिशपसाठी अर्ज केलेल्या विदयार्थ्यांनी त्यांचा फार्म https://mahadbt.maharashtra.gov.in या पोर्टलवर वेळोवेळी लॉगीन करून तपासुन संबधीत अर्ज केलेल्या फॉर्मचा आढावा घेणे आवश्यक आहे.
- शिष्यवृत्ती व फ्रिशपसाठी अर्ज केलेल्या विदयार्थ्यांनी https://mahadbt.maharashtra.gov.in या लॉगीन करून apply Scheme वर जावून Application ID वर क्लीक केल्यावर विदयार्थ्यांच्या फॉर्मची History दिसेल त्यानुसार विदयार्थ्यांने आपली त्रुटी असल्यास ऑनलाईन पध्दतीने त्रुटी पुर्तता विदयार्थ्यांनी करणे बंधनकारक आहे. अन्यथा शिष्यवृत्ती/फ्रिशिप न मिळाल्यास त्यास सर्वस्वी विदयार्थी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

**ऑनलाईन शिष्यवृत्ती व फ्रीशिपच्या फॉर्मसोबत सर्व मुळ कागदपत्रे अपलोड करावी. झेरॉक्स कागदपत्रे अपलोड करु नये. सर्व मुळ कागदपत्रांच्या आधारे विद्यार्थ्याच्या शिष्यवृत्ती व फ्रीशिप फॉर्मची ऑनलाईन तपासणी होणार आहे.**

**ऑनलाईन भरलेले शिष्यवृत्ती फॉर्म महाविदयालयात व आवश्यक कागदपत्रे महाविदयालयात जमा करण्यासंबधात सविस्तर सुचना सुचना फलकावर लावण्यात येईल.**

प्राचार्य
**भोसला मिलिटरी कॉलेज,**
**रामभूमी, नाशिक**